**प्रेसनोट**

**एम.आय.डी.सी.पो.स्टे.जळगांव**
दि. 06/04/2026

**प्रति,**

**दै.------------------------------------ -- संपादक,**

**जळगांव**

**विषय :- अट्टल घरफोडी करणारा चोरटा 24 तासांच्या आत एम.आय.डी.सी.पोलीसांच्या ताब्यात.....**

दिनांक 25/03/2026 रोजी सकाळी 10.00 ते दि.04/04/2026 रोजी सकाळी 06.00 वाजेच्या दरम्यान मंजुशा हाँउसिंग सोसायटी गणेशवाडी येथील फिर्यादी यांचे वहिनी वंदना मोहन आटाळे यांचे घराचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने दरवाज्याचे कडी कोंडा तोडुन घरफोडी करुन एकुन 57000/- रुपये किंमतीचा चांदीचे तसेच ताब्याचे वस्तु चोरी केल्याने फिर्यादी नामे प्रमोद नामदेव आटाळे वय-54 वर्षे व्यवसाय नोकरी रा नंदनवन काँलनी प्लाँट नं 5 गणेश काँलनी रोड एच पी पेट्रोलपंपाच्या मागे जळगाव यांनी फिर्याद दिल्याने दि - 04/04/2026 रोजी गुरनं. 249/2026 बी.एन.एस.एस. कलम 305(अ),331(3),331(4) प्रमाणे अज्ञात चोरटया विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता .

मा.पोलीस निरीक्षक श्री बबन आव्हाड सो. यांनी नमुद घरफोडी उघड करण्याचे अनुशंगाने मा. पोउपनि. चंद्रकांत धनके , पोहेकॉ/70 रामकृष्ण पाटील ,पोकॉ/291 नितीन ठाकुर, पोकॉ/342 किरण पाटील, पोकॉ/677 राहुल घेटे अशांना आदेश दिल्याने सदर पथकाने सदर घरफोडी उघड करण्याच्या उददेशने गोपनिय बातमी तसेच तांत्रीक विष्लेशन करुन नमुद अज्ञात आरोपीचा शोध घेवुन संशयीत आरोपी नामे - शाकिब शेख ताजोउद्दीन शेख वय-23 वर्ष रा. कासमवाडी, रचना कॉलणी जळगाव यास ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता सदर आरोपी याने नमुद घरफोडी केल्याची कबुली दिल्याने गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल 1) अर्धा ग्राम सोण्याची नाकातील फुली 2) चांदीची देवाऱ्यात ठेवण्याची विट 3)चांदीची अण्णपुर्णा देवीची मुर्ती 4)चांदीचा चद्रकोर 5) चांदीची लक्ष्मीची मुर्ती 6) चांदीचा हत्ती 7) गृहउपयोगी तांब्याची भांडी असे एकुन 57000/-रु.कि.मी चे मुद्देमाल त्याचे कडुन जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास तपास पोहेकॉ/70 रामकृष्ण पाटील , पोना /3049 मोतीलाल बोरसे करीत आहेत

सदर कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री महेश्वर रेड्डी, मा.अपर पोलीस अधीक्षक, श्री अशोक नखाते मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री नितीन गनापुरे, पोलीस निरीक्षक श्री बबन आव्हाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली..

**( बबन आव्हाड )**

**पोलीस.निरिक्षक.पोस्टे एमआयडीसी**
**जळगाव**